जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २६२ दिनांक -१८/०६/२०२४**

भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे

## चाकुचा धाक दाखवुन लुटणा-या सराईत आरोपीस केले जेरबंद

दिनांक ११/०६/२०२४ रोजी कात्रज चौक येथुन सोलापुर येथे जाणेकरीता फिर्यादी रा.कात्रज,पुणे हे बसची वाट पाहत थांबले असताना दोन अनोळखी इसम फिर्यादी यांचेकडे आले व त्यांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करुन तु कुठे राहतो असे विचारुन तुझ्या खिशातील पैसे काढ असे म्हणुन फिर्यादी यांचा मोबाईल हिसकवण्याचा प्रयत्न केला असता त्यास फिर्यादी यांनी प्रतिकार केला असता त्यांनी फिर्यादी यांना हाताने मारहाण करुन एका इसमाने त्याकडील लोखंडी हत्याराचा धाक दाखवुन फिर्यादी यांचे पॅंटच्या खिशातील १३००/- रुपये असलेले पैशाचे पाकीट जबरदस्तीने काढुन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन,हाताने मारहाण केली म्हणुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ५०४/२०२४, भादंवि कलम ३९४,३४ अन्वये गुन्हा दाखल आहे.

नमुद गुन्हयातील आरोपींचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार महेश बारवकर व निलेश ढमढेरे यांना गोपनिय बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, वर नमुद दाखल गुन्हा रेकॉर्डवरील आरोपी १) दिपक राजेंद्र वाघमारे, वय १९ वर्षे, रा. आंबेडकरनगर, आर.के कॉलनी समोर, गोकुळनगर, कात्रज कोंढवा रोड, कात्रज, पुणे व एक विधीसंघर्षीत बालक यांनी केला असुन दोघे गल्ली क्र. ०३, आंबेडकरनगर, आर.के. कॉलनी, कात्रज, पुणे येथे किराणा मालाच्या दुकानाजवळ थांबले आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने तपास पथकाचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी आर.के. कॉलनी, कात्रज पुणे येथे जावुन नमुद दोघांचा शोध घेत असता ते मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन पोलीस ठाणे येथे आणुन त्यांचेकडे अधिक चौकशी करता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने आरोपी दिपक वाघमारे यास दिनांक १७/०६/२०२४ रोजी अटक केली आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे श्रीमती नंदीनी वग्याणी यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री डी.एस.पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शरद झिने, तपास पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक समीर कदम,पोलीस उपनिरीक्षक धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार महेश बारवकर, निलेश ढमढेरे, नामदेव रेणुसे, शैलेश साठे, चेतन गोरे, हनमंत मासाळ, निलेश जमदाडे, मंगेश पवार,सचिन सरपाले, निलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, अवधतु जमदाडे, अभिनय चौधरी, सचिन गाडे, विक्रम सावंत, मितेश चोरमोले यांच्या पथकाने केली आहे.